युटा मराठी मंडळ
आरती संग्रह

Utah Marathi Mandal
www.UtahMarathi.com

v2.1

गणपती आरती

सुखकर्ता दु:खहर्ता वार्ता विघ्नची | नुरवी पुरव प्रेम कृपा जयची |
सर्वांगी सुंदर उटि शेंदुराची | कंठी झळके माळ मुक्ताहफळांची || १ ||

जयदेव जयदेव जय मंगलमुर्ती | दर्शनमात्रे मनःकामना पुरती ॥ धृ ॥

रत्नखचित फरा तुज गौरीकुमरा | चंदनाची उटी कुंकमकेशरा ||
हिरेजडित मुगुट शोभतो बरा | रुणझुणती नुपुरें चरणी घागरिया || २ ||

लंबोदर पीतांबर फणिवरबंधना | सरळ सोंड वक्रतुंड त्रिनयना |
दास रामाचा वाट पाहे सदना | सकटी पावावे निर्वाणी रक्षावे सुरवरवंदना || ३ ||

देवीची आरती

दुर्गे दुर्गटभारी, तुजविण संसारी । अनाथनाथे अंबे, करुणा विस्तारी ॥
वारी वारी, जन्म मरणांतें वारी । हारी पडलो आता, संकट निवारी || १ ||

जय देवी जय देवी, जय महिषासुरमथिनी । सुरवर ईश्वर वरदे, तारक संजीवनी,
जय देवी जय देवी ॥ धृ ॥

त्रिभुवनी भुवनी पाहता, तुज ऐसे नाही । चारी श्रमले परंतु, न बोलवे काही ॥
साही विवाद करता ,पडले प्रवाही । ते तू भक्तांलागी,ते तु दासालागी, पावसि
लवलाही || २ ||

प्रसन्नवदने, प्रसन्न होशी निजदासा । क्लेशापासुन सोडी, तोडी भवपाशा ॥
अंबे तुजवाचून, कोण पुरवील आशा । नरहरि तल्लिन झाला, पदपंकजलेशा || ३ ||

श्री दत्तात्रेयांची आरती

त्रिगुणात्मक त्रैमूर्ती दत्त हा जाणा
त्रिगुणी अवतार त्रैलोक्य राणा
नेति नेति शब्द न ये अनुमाना
सुरवर मुनिजन योगी समाधी न ये ध्याना || १ ||

सबाह्य अभ्यंतरी तू एक दत्त
अभाग्यासी कैसी न कळे ही मात
पराही परतली तेथे कैचा हा हेत
जन्म मरणाचा पुरलासे अंत || २ ||

दत्त येऊनिया उभा ठाकला
भावे साष्टांगेसी प्रणिपात केला
प्रसन्न होउनी आशीर्वाद दिधला
जन्ममरणाचा फेरा चुकविला || ३ ||

दत्त दत्त ऐसे लागले ध्यान
हरपले मन झाले उन्मन
मी तू पणाची झाली बोळवण
एका जनार्दनी श्रीदत्त ध्यान || ४ ||

शंकराची आरती

लवथवती विक्राळा ब्रह्मांडी माळा,
वीषे कंठ काळा त्रिनेत्री ज्वाळा ।
लावण्य सुंदर मस्तकी बाळा,
तेथुनिया जळ निर्मळ वाहे झुळझुळा || १ ||

जय देव जय देव जय श्रीशंकरा,
आरती ओवाळू तुज कर्पुरगौरा ।
जय देव जय देव ॥ धृ ॥

कर्पुरगौरा भोळा नयनी विशाळा,
अर्धांगी पार्वती सुमनांच्या माळा ।
विभुतीचे उधळण शितकंठ नीळा,
ऐसा शंकर शोभे उमा वेल्हाळा || २ ||

देवी दैत्यी सागरमंथन पै केले,
त्यामाजी अवचित हळहळ जे उठले ।
ते त्वा असुरपणे प्राशन केले,
नीलकंठ नाम प्रसिद्ध झाले || ३ ||

व्याघ्रांबर फणिवरधर सुंदर मदनारी,
पंचानन मनमोहन मुनिजनसुखकारी ।
शतकोटीचे बीज वाचे उच्चारी,
रघुकुलटिळक रामदासा अंतरी || ४ ||

आरती विठ्ठलाची (युगे अठ्ठावीस)

युगे अठ्ठावीस विटेवरी उभा
वामाङ्गी रखुमाईदिसे दिव्य शोभा ।
पुण्डलिकाचे भेटि परब्रह्म आले गा
चरणी वाहे भीमा उद्धरी जगा ॥ १ ॥

जय देव जय देव जय पांडुरंगा ।
रखुमाई वल्लभा राईच्या वल्लभा पावे जिवलगा ॥ धृ ॥

तुळसीमाळा गळा कर ठेऊनी कटी
कासे पीताम्बर कस्तुरी लल्लाटी ।
देव सुरवर नित्य येती भेटी
गरुड हनुमन्त पुढे उभे राहती ॥ २ ॥

धन्य वेणूनाद अणुक्षेत्रपाळा
सुवर्णाची कमळे वनमाळा गळा ।
राई रखुमाबाई राणीया सकळा
ओवाळिती राजा विठोबा सावळा ॥ ३ ॥

ओवाळू आरत्या कुरवण्ड्या येती
चन्द्रभागेमाजी सोडुनिया देती ।
दिण्ड्या पताका वैष्णव नाचती
पण्ढरीचा महिमा वर्णावा किती ॥ ४ ॥

आषाढी कार्तिकी भक्तजन येती
चन्द्रभागेमाजी स्नाने जे करिती ।
दर्शन होळामात्रे तया होय मुक्ति
केशवासी नामदेव भावे ओवाळिती ॥ ५ ॥

आरती विठ्ठलाची (येई हो विठ्ठले)

येई हो विठ्ठले माझे माऊली ये ।
निढळावरी कर ठेवुनि वाट मी पाहे ॥ धृ ॥

आलिया गेलिया हाती धाडी निरोप ।
पंढरपूरी आहे माझा मायबाप ॥ १ ॥

पिवळा पीतांबर कैसा गगनी झळकला ।
गरुडांवर बैसोनि माझा कैवारी आला ॥ २ ॥

विठोबाचे राज्य आम्हां नित्य दिपवाळी ।
विष्णुदास नामा जीवेभावे ओंवाळी ॥ ३ ॥

असो नसो भाव आम्हा तुझिया ठाया ।
कृपादृष्टी पाहे माझ्या पंढरीराया ॥ ४ ॥

श्री ज्ञानदेवाची आरती

आरती ज्ञानराजा | महाकैवल्यतेजा | सेविती साधुसंत ||
मनु वेधला माझा || आरती ज्ञानराजा || धृ ||

लोपलें ज्ञान जगी |
हित नेणती कोणी |
अवतार पांडुरंग |
नाम ठेविले ज्ञानी || १ ||
आरती ज्ञानराजा... ||

कनकाचे ताट करी |
उभ्या गोपिका नारी |
नारद तुंबर हो |
साम गायन करी || २ ||
आरती ज्ञानराजा... ||

प्रकट गुह्य बोले |
विश्व ब्रम्हाची केलें |
रामजनार्दनी |
पायी मस्तक ठेविले || ३ ||
आरती ज्ञानराजा... ||

आरती ॐ जय जगदीश हरे

ॐ जय जगदीश हरे, स्वामी जय जगदीश हरे।
भक्त जनों के संकट, क्षण में दूर करे॥ ॐ जय जगदीश...

जो ध्यावे फल पावे, दुःख बिनसे मन का।
सुख सम्पति घर आवे, कष्ट मिटे तन का॥ ॐ जय जगदीश...

मात पिता तुम मेरे, शरण गहूं मैं किसकी।
तुम बिन और न दूजा, आस करूं मैं जिसकी॥ ॐ जय जगदीश...

तुम पूरण परमात्मा, तुम अंतरयामी।
पारब्रह्म परमेश्वर, तुम सब के स्वामी॥ ॐ जय जगदीश...

तुम करुणा के सागर, तुम पालनकर्ता।
मैं सेवक तुम स्वामी, कृपा करो भर्ता॥ ॐ जय जगदीश...

तुम हो एक अगोचर, सबके प्राणपति।
किस विधि मिलूं दयामय, तुमको मैं कुमति॥ ॐ जय जगदीश...

दीनबंधु दुखहर्ता, तुम रक्षक मेरे।
करुणा हाथ बढ़ाओ, द्वार पड़ा तेरे॥ ॐ जय जगदीश...

विषय विकार मिटाओ, पाप हरो देवा।
श्रद्धा भक्ति बढ़ाओ, संतन की सेवा॥ ॐ जय जगदीश...

घालीन लोटांगण

घालीन लोटांगण, वंदीन चरण ।
डोळ्यांनी पाहीन रुप तुझें ।
प्रेमें आलिंगन, आनंदे पूजिन ।
भावें ओवाळीन म्हणे नामा || १ ||

त्वमेव माता च पिता त्वमेव।
त्वमेव बंधुश्च सखा त्वमेव ।
त्वमेव विध्या द्रविणं त्वमेव ।
त्वमेव सर्वं मम देवदेव || २ ||

कायेन वाचा मनसेंद्रीयेव्रा |
बुद्धयात्मना वा प्रकृतिस्वभावात ।
करोमि यध्यत सकलं परस्मे |
नारायणायेति समर्पयामि || ३ ||

अच्युतं केशवं रामनारायणं |
कृष्णदामोदरं वासुदेवं हरिम।
श्रीधरं माधवं गोपिकावल्लभं |
जानकीनायकं रामचंद्र भजे || ४ ||

हरे राम हर राम, राम राम हरे हरे ।
हरे कृष्ण हरे कृष्ण, कृष्ण कृष्ण हरे हरे ।

कापूर आरती

करपूर गौरम करूणावतारम
संसार सारम भुजगेन्द्र हारम |
सदा वसंतम हृदयारविंदे
भवम भवानी सहितं नमामि ||

सर्व मंगल मांग्लयै
शिवे सर्वार्थ साधिके |
शरण्ये त्रयम्बके गौरी
नारायणी नमोस्तुते ||

मंत्रपुष्पांजलि

ॐ यज्ञेन यज्ञमयजन्त देवास्तानि धर्माणि प्रथमान्यासन् |
ते ह नाकं महिमानः सचन्त यत्र पूर्वे साध्याः सन्ति देवाः || १ ||

ॐ राजाधिराजाय प्रसह्यसाहिने
नमो वयं वैश्रवणाय कुर्महे |
स मे कामान्कामकामाय मह्यम्
कामेश्वरो वैश्रवणो ददातु |
कुबेराय वैश्रवणाय महाराजाय नमः || २ ||

ॐ स्वस्ति| साम्राज्यं भौज्यं
स्वाराज्यं वैराज्यं पारमेष्ठ्यं
राज्यं माहाराज्यमाधिपत्यमयं
समंतपर्यायी स्यात्सार्वभौमः सार्वायुष
आंतादापरार्धात्पृथिव्यै समुद्रपर्यंताया एकराळिति || ३ ||

तदप्येषः श्लोको ऽभिगीतो |
मरुतः परिवेष्टारो मरुत्तस्यावसन् गृहे |
आविक्षितस्य कामप्रेर्विश्वे देवाः सभासद इति || ४ ||

ॐ एकदन्ताय बिद्महे वक्रतुण्डाय धीमहि तन्नो दन्ती प्रचोदयात् ॥